मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com
» पुणे, पिंपरी-चिंचवड
» गुरुवार, दि. 07 मे 2026 | पान- 1

# सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर प्रशासनाचा फोकस

## शेरसिंग डागोर यांचे संवेदनशीलतेने प्रश्न सोडवण्याचे निर्देश, प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासन कटिबद्ध

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराची स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्य टिकवून ठेवण्यामध्ये सफाई कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मात्र, काम करताना त्यांना आरोग्यविषयक धोके, साधनांची कमतरता आणि प्रशासकीय अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे त्यांच्या समस्या केवळ नोंदवून न ठेवता त्या तातडीने आणि संवेदनशीलतेने सोडवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आयोजित सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व प्रश्नांबाबत राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.



या बैठकीच्या प्रारंभी महापौर रवि लांडगे यांनी राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांचे स्वागत केले.

या बैठकीस आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, सह शहर अभियंता प्रेरणा सिनकर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, संदीप खोत, अण्णा बोदडे, पंकज पाटील, अतुल पाटील, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, अश्विनी गायकवाड, पूजा दूधनाळे, निवेदिता घार्गे, कार्यकारी अभियंता राजेंद्र जावळे, राजेंद्र शिंदे, जाहिरा मोमीन, महेश बरीदे, विनय ओहोळ, सोहन निकम, मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, आरोग्य निरीक्षक यांच्यासह सफाई कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी सागर चरण, गणेश भोसले, किशन आरडे, अनिल चावरे, मुकेश लोट, अनिल लखन, राजेश काकडे, करण चव्हाण, मोश पुन्ने, दर्पण चोपडे, सायली चनगुंडी आदी उपस्थित होते.

### प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासन कटिबद्ध

» यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी महापालिकेच्या वतीने सफाई कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजना प्रभावीपणे राबवल्या जात असल्याचे सांगितले. सफाई कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाने गतीने काम सुरू केले आहे. ज्या ठिकाणी तांत्रिक किंवा प्रक्रियात्मक अडचणी येत आहेत, त्या दूर करण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. संबंधित सर्व शासन निर्णय आणि परिपत्रकांचा सखोल अभ्यास करून निर्णय प्रक्रिया अधिक गतिमान केली जात आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

### ठोस पावले उचलावीत..

» शेरसिंग डागोर म्हणाले, सफाई कर्मचाऱ्यांना सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने विविध धोरणे राबवली आहेत. मात्र, या योजनांचा लाभ प्रत्यक्षात कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी महापालिका प्रशासनाने अधिक सक्रिय भूमिका घ्यावी.सफाई कर्मचाऱ्यांच्या हक्क आणि अधिकारांची अंमलबजावणी ही केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात झाली पाहिजे. त्यांच्या वारसांना शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, तसेच विविध योजनांचा लाभ विनाअडथळा मिळवून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

# पिंपरी चिंचवडला 'स्पोर्ट्स सिटी' म्हणून जागतिक ओळख मिळावी

## नगरसेविका कविता भोंगाळे यांची स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीसाठी आग्रही भूमिका

**पिंपरी | प्रतिनिधी**

औद्योगिक आणि शैक्षणिक केंद्र म्हणून नावलौकिक मिळवल्यानंतर आता पिंपरी चिंचवड शहराला क्रीडा क्षेत्रातही जागतिक स्तरावर नेण्यासाठी महत्त्वाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जनरल बॉडी सभेत नगरसेविका सौ. कविता भोंगाळे - पाटील यांनी शहरात अत्याधुनिक सुविधांनी सज्ज अशी 'स्पोर्ट्स युनिव्हर्सिटी' उभारण्याची आग्रही मागणी केली असून, आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवडला खऱ्या अर्थाने 'स्पोर्ट्स सिटी' बनवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.



सभेमध्ये आपला प्रस्ताव मांडताना कविता भोंगाळे यांनी शहराच्या क्रीडा क्षमतेवर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या की, पिंपरी चिंचवड शहराने उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात मोठी प्रगती केली असली, तरी क्रीडा क्षेत्रातही शहराची क्षमता अफाट आहे. मात्र, स्थानिक खेळाडूंना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण आणि सोयीसुविधा मिळवण्यासाठी अनेकदा संघर्ष करावा लागतो. ही उणीव भरून काढण्यासाठी एकाच छताखाली आधुनिक क्रीडा सुविधा, अनुभवी प्रशिक्षक आणि खेळाडूंना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणारी स्वतंत्र स्पोर्ट्स युनिव्हर्सिटी उभारणे ही काळाची गरज आहे. या विद्यापीठामुळे शहरातील उदयोन्मुख खेळाडूंना व्यावसायिक मार्गदर्शन लाभेल, ज्यातून भविष्यात ऑलिम्पिक, आशियाई खेळ आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके जिंकणारे खेळाडू घडवता येतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

केवळ प्रशिक्षणावर न थांबता, क्रीडा क्षेत्राकडे एक सन्माननीय करिअर म्हणून पाहिले जावे, यासाठीही त्यांनी महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर शहराचे नाव उज्ज्वल करणाऱ्या गुणवंत खेळाडूंना महानगरपालिकेच्या सेवेत योग्य पदांवर नियुक्त करून त्यांचा यथोचित सन्मान करावा, अशी मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली. खेळाडूंना नोकरीची सुरक्षितता मिळाल्यास तरुण पिढी अधिक जोमाने क्रीडा क्षेत्राकडे वळेल आणि शहरात एक निकोप क्रीडा संस्कृती निर्माण होईल, असे त्यांनी नमूद केले.

आमदार महेशदादा लांडगे यांच्या संकल्पनेतील 'स्पोर्ट्स सिटी' साकारण्यासाठी हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे ठरणार असून, प्रशासनाने या प्रस्तावाकडे गांभीर्याने पाहून तातडीने निर्णय घ्यावा, अशी विनंती कविता भोंगाळे यांनी केली. या मागणीमुळे शहरातील क्रीडा प्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण असून, पिंपरी चिंचवडच्या शिरपेचात लवकरच क्रीडा क्षेत्रातील मानाचा तुरा रोवला जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# शहरात महिला सुरक्षा आणि पोलीस गस्त वाढवा : सभापती अभिषेक बारणे

## नसरापूर घटनेचे पिंपरी-चिंचवड महापालिका सभेत तीव्र पडसाद; पोलीस आयुक्तांसोबत तातडीने बैठक घेण्याची सभापती अभिषेक बारणे यांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील नसरापूर येथे घडलेल्या अत्याचाराच्या घटनेने संपूर्ण शहर हादरले असून, या घटनेचे अत्यंत तीव्र पडसाद पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत उमटले. या अमानवीय घटनेचा निषेध करत असतानाच, शहरातील ढासळलेल्या कायदा व सुव्यवस्थेबाबत नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले. महापौर रवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेत, शहरातील महिलांची सुरक्षा आणि गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी महापालिका आयुक्त आणि पोलीस आयुक्त यांनी तातडीने संयुक्त बैठक घेऊन ठोस कृती आराखडा तयार करावा, अशी आग्रही मागणी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी केली.



सभेला संबोधित करताना अभिषेक बारणे यांनी अत्यंत भावूक आणि आक्रमक भूमिका मांडली. ते म्हणाले की, नसरापूरची घटना केवळ हृदय पिळवटून टाकणारी नसून ती समाजाच्या संवेदनशीलतेवर मोठा आघात आहे. अशा घटनांमध्ये बळी पडलेल्या कुटुंबांची अवस्था काय असेल, याची कल्पनाही करवत नाही. अनेकदा पीडित कुटुंबावर सामाजिक किंवा इतर दबाव असतो, त्यामुळे अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये पोलिसांनी केवळ तक्रारीची वाट न पाहता स्वतःहून फिर्यादीची भूमिका पार पाडावी, जेणेकरून खटला अधिक मजबूत होईल आणि गुन्हेगारांना फाशीसारखी कठोर शिक्षा मिळेल.

शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी यंत्रणा राबवण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. शहरात मोठ्या प्रमाणावर परप्रांतीय आणि नवीन लोक वास्तव्यास येत असतात, त्यामुळे शहरातील सर्व भाडेकरूंची अधिकृत नोंदणी होणे आता अनिवार्य झाले आहे. या प्रक्रियेत दिरंगाई होता कामा नये. तसेच, नसरापूर घटनेच्या तपासात काय निष्पन्न झाले आणि न्यायालयीन निकालाची सद्यस्थिती काय आहे, याची सविस्तर माहिती महापालिकेच्या कायदा विभागाने संकलित करावी. शहरातील सर्व १२८ विद्यमान नगरसेवकांना या निकालाची माहिती मिळायला हवी, कारण प्रभागातील नागरिक आपल्या लोकप्रतिनिधींना जाब विचारत असतात आणि त्या ठिकाणी उत्तर देणे नगरसेवकांना कठीण जात आहे.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, पोलीस आयुक्त आणि महापालिका आयुक्त यांनी एकमेकांशी समन्वय साधून शहरातील कायदा व सुव्यवस्थेबाबत व्यापक चर्चा करावी. केवळ आश्वासन नको तर जमिनीवर ठोस उपाययोजना दिसल्या पाहिजेत, असा इशाराही यावेळी देण्यात आला. सभेच्या शेवटी, नसरापूर घटनेशी संबंधित सर्व माहिती आणि प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढील बैठक आयोजित करण्यापूर्वी सभागृहासमोर सादर करावा, असे आदेशही देण्यात आले. या चर्चेत शहरातील इतर नगरसेवकांनीही सहभाग घेत महिला सुरक्षा आणि पोलीस गस्त वाढवण्याची मागणी लावून धरली.

# पिंपरी-चिंचवडच्या कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर

## मोशी कचरा डेपोवरील भार कमी करण्यासाठी नव्या जागेच्या आरक्षणाची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे आणि शहरी विस्तारामुळे कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न आता गंभीर व दीर्घकालीन स्वरूप धारण करू लागला आहे. शहराचा संपूर्ण कचरा वर्षानुवर्षे केवळ मोशी येथील कचरा डेपोमध्ये जमा केला जात असल्याने या परिसरावरील ताण प्रचंड वाढला आहे. संपूर्ण शहरातून एकाच ठिकाणी कचरा वाहून नेणे प्रशासनासाठी खर्चिक आणि वेळखाऊ ठरत असून, आता या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज निर्माण झाली आहे.



यापूर्वी पुनावळे येथे कचरा डेपोसाठी आरक्षण निश्चित करण्यात आले होते, मात्र त्यावेळी तिथे लोकवस्ती कमी होती. प्रशासनाने वेळेत हे आरक्षण विकसित न केल्याने कालांतराने तिथे नागरीकरण वाढले आणि स्थानिक नागरिकांनी या डेपोला तीव्र विरोध दर्शवला. परिणामी, पुनावळेचे आरक्षण रद्द करावे लागल्याने कचऱ्याचा संपूर्ण भार पुन्हा मोशी डेपोवर येऊन पडला आहे. ही परिस्थिती केवळ स्थानिक रहिवाशांसाठी अन्यायकारक नसून, ती सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरणाच्या दृष्टीनेही धोकादायक ठरत आहे. त्यामुळे 'एकाच ठिकाणी कचरा टाकणे' हा या समस्येवरचा उपाय नसून उलट ती समस्येचे मूळ ठरत असल्याचे स्पष्ट होत आहे.

शहराचा संपूर्ण कचरा वर्षानुवर्षे केवळ मोशी येथील कचरा डेपोमध्ये जमा केला जात असल्याने या परिसरावरील ताण प्रचंड वाढला आहे. संपूर्ण शहरातून एकाच ठिकाणी कचरा वाहून नेणे प्रशासनासाठी खर्चिक आणि वेळखाऊ ठरत असून, आता या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज निर्माण झाली आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत भाजपा सत्तेत आल्यानंतर आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून वेस्ट टू एनर्जी, बायोमायनिंग, सी अँड डी वेस्ट आणि हॉटेल वेस्टपासून गॅस निर्मिती असे विविध सकारात्मक प्रकल्प राबवले जात आहेत. मात्र, शहराची भविष्यातील गरज लक्षात घेता कचरा डेपोसाठी नवीन जागा आरक्षित करणे अत्यंत आवश्यक आहे. पुढील २०-३० वर्षांचे नियोजन करून स्वतंत्र, वैज्ञानिक आणि पर्यावरणपूरक कचरा डेपो उभारणे ही काळाची गरज बनली आहे. या नवीन ठिकाणी कचऱ्याचे वर्गीकरण, प्रक्रिया आणि पुनर्वापर यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी, तसेच तिथे हरित पट्टा निर्माण करण्यात यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. महानगरपालिका आयुक्तांनी याप्रकरणी तातडीने ठोस निर्णय घेऊन प्रशासनाला योग्य त्या सूचना द्याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> **"सध्या मोशी कचरा डेपोची परिस्थिती पाहता माझ्या सेक्टर नंबर ४, ६, ९ आणि ११ मधील नागरिकांना सकाळी उठल्यावर सूर्याचे दर्शन घेण्याऐवजी सर्वात आधी कचरा डेपोचेच दर्शन घ्यावे लागते. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार सकाळी स्वच्छ वातावरणात फिरणे आरोग्यासाठी चांगले असते, मात्र येथील नागरिकांना सकाळीच कचऱ्याच्या उग्र वासाला सामोरे जावे लागते. ही परिस्थिती अत्यंत त्रासदायक असून प्रशासनाने यावर त्वरित उपाययोजना करणे गरजेचे आहे."**
>
> **- नम्रता लोंढे, नगरसेविका.**

# पालखीच्या स्वागताला फटाके, ध्वनिक्षेपक नकोत सोहळा प्रमुखांची मागणी !

## महापौर मंजूषा नागपुरे यांच्याकडे सोहळा प्रमुखांची मागणी, पालखी मार्गावर स्वच्छता, पाणी व वैद्यकीय सुविधांवर भर

**पुणे | प्रतिनिधी**

पंढरपूरला जाण्यासाठी पुण्यात येणाऱ्या पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि संघटनांकडून जागोजागी मोठ्या आवाजात ध्वनिक्षेपक लावले जातात. तसेच फटाकेदेखील फोडले जातात. यामुळे वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना व्यत्यय येतो. भजन आणि अभंग गाताना अडथळे निर्माण होतात. त्यामुळे पालखीच्या स्वागतासाठी ध्वनिक्षेपक आणि फटाक्यांवर बंदी घालावी,' अशी मागणी पालखी सोहळा प्रमुखांनी पुण्याचे महापौर मंजूषा नागपुरे यांच्याकडे केली.

संत ज्ञानेश्वर महाराज, तसेच संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा पंढरपूर येथे जाताना दोन दिवस पुणे मुक्कामी असतो. या पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील व्यवस्थापन सुरळीत पार पाडण्यासाठी महापालिका प्रशासनाने केलेल्या नियोजनाचा आढावा महापौरांनी घेतला. या वेळी महापालिका आयुक्त नवल किशोर राम, महापालिकेतील पक्षनेते, पोलीस अधिकारी, तसेच पालखी सोहळा विश्वस्त उपस्थित होते. त्या वेळी ही मागणी करण्यात आली. यावर योग्य मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आल्याचे नागपुरे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.



### पालखी स्वागतावर निर्बंधाची मागणी

**» पंढरपूरकडे जाणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याच्या स्वागतावेळी होणाऱ्या गोंगाटाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. पालखी सोहळा प्रमुखांनी महापौर मंजूषा नागपुरे यांच्याकडे ध्वनिक्षेपक व फटाक्यांवर बंदी घालण्याची मागणी केली. मोठ्या आवाजामुळे वारकऱ्यांच्या भजन-अभंगात अडथळे येत असल्याचे त्यांनी सांगितले. या मागणीवर योग्य तो मार्ग काढण्याचे आश्वासन महापौरांनी दिले असून, प्रशासनाकडून शांत व सुयोग्य स्वागताचे नियोजन करण्यावर भर दिला जात आहे.**

'पालखी मार्गावरील संपूर्ण परिसर स्वच्छ ठेवणे, स्वागत मंडळाकडून पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करणे, ठिकठिकाणी स्वच्छतागृहे उभारणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुक्कामाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देताना पालखी आगमन व प्रस्थान मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती तातडीने पूर्ण करावी,' असे आदेश महापौर नागपुरे यांनी प्रशासनाला दिले.

पालखी मुक्कामी असलेल्या मुख्य ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वैद्यकीय तपासणी व आवश्यक सेवा केंद्रे उभारण्यात यावीत. तसेच, शाळा व प्रशासकीय यंत्रणा यांचा योग्य समन्वय साधून कार्यवाही करण्यात यावी. भाविकांच्या सोयीसाठी पीएमपी बससेवा योग्य ठिकाणी उपलब्ध करून द्याव्यात. बोपोडी परिसरात पालखी जाताना तीव्र चढ-उतार असल्याने तेथे 'हाइट बॅरिअर' उभारण्याची सूचना करण्यात आली असून, संबंधित काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्फत तातडीने पूर्ण करावे. उत्सव काळात प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीचे नियोजन काटेकोरपणे अंमलात आणण्यात यावे.संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज पालखी आगमनाच्या वेळी होणारी गर्दी लक्षात घेता, होळकर पुल परिसरातील पाच तासांचा कालावधी कमी करण्याबाबत उपाययोजना करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

### पालखी सोहळ्यासाठी विशेष व्यवस्था

**» पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेकडून व्यापक नियोजन करण्यात येत आहे. पालखी मार्गावरील स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहे व वैद्यकीय सेवा केंद्रे उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच वाहतूक नियंत्रण, रस्त्यांची दुरुस्ती आणि पीएमपी बससेवा उपलब्ध करण्यावर भर देण्यात आला आहे. बोपोडी व खडकी परिसरात विशेष व्यवस्था करण्यात येणार असून, भाविकांना सुरक्षित व सुलभ दर्शन मिळावे यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.**

### 'मुक्काम बदलाचा निर्णय घेतलाच नाही'

**» 'शहरात दाखल होणाऱ्या पालखीचा मुक्काम बदलण्याचा कोणताही निर्णय पालखी सोहळा समितीने घेतला नसल्याचे या बैठकीत विश्वस्तांनी स्पष्ट केले. याबाबत कोणतीही घोषणा सोहळा समितीच्या वतीने करण्यात आली नसल्याचे स्पष्टीकरण बैठकीसाठी उपस्थित विश्वस्तांनी दिले, असे महापौर मंजूषा नागपुरे यांनी सांगितले.**

---

# ऐनवेळच्या प्रस्तावांना महापालिका आयुक्तांचा लगाम! प्रशासनाला दिले महत्त्वाचे आदेश..

## आयत्यावेळी सादर होणाऱ्या प्रस्तावांबाबत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या मुख्य सभा तसेच विविध समित्यांच्या बैठकीत आयत्यावेळी सादर होणाऱ्या प्रस्तावांबाबत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. कोणत्याही बैठकीत विषय समाविष्ट करण्यासाठी संबंधित विभागाने किमान एक दिवस अगोदर प्रस्ताव संबंधित अतिरिक्त महापालिका आयुक्तांकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

आयुक्त राम यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत. पुणे महापालिकेच्या स्थायी समिती, शहर सुधारणा समिती तसेच इतर विषय समित्यांच्या बैठकींमध्ये अनेकदा विभागप्रमुख आयत्यावेळी प्रस्ताव मांडून त्याला तातडीने मान्यता द्यावी, अशी मागणी करतात. यामुळे संबंधित विषयांची पुरेशी माहिती उपलब्ध होत नाही. तसेच बैठकीत या प्रस्तावांबाबत समितीच्या सदस्यांनी त्यावर प्रश्न उपस्थित केल्यास आणि अधिकची माहिती मागितल्यास त्यावर सविस्तर चर्चा करणे अडचणीचे ठरते.



महापालिकेच्या विविध समितीच्या बैठकीमध्ये कार्यपत्रिकेवर कमी विषय मांडून आयत्या वेळेस मोठ्या संख्येने प्रस्ताव मान्यतेसाठी आणून ते मंजूर करून घेण्याचा एक नवीन पायंडा गेल्या काही महिन्यांपासून पडला आहे. या नवीन पद्धतीमुळे महापालिका आयुक्तांसह अतिरिक्त आयुक्त, लोकप्रतिनिधी म्हणून काम करणारे समितीचे सदस्य देखील त्रस्त झाले आहेत. यावरून समितीच्या बैठकांमध्ये प्रशासनाला अनेकदा जाबही विचारण्यात आलेला आहे.

तसेच अपुऱ्या माहितीतून घेतलेले निर्णय हे महापालिकेच्या धोरणांशी किंवा शासन निर्णयांशी विसंगत ठरण्याची शक्यता असते. यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. हे सर्व प्रकार टाळण्यासाठी आणि कामांमध्ये अधिकाधिक पारदर्शकता येऊन नागरिकांच्या हिताची कामे कमी वेळेत मार्गी लागावीत यासाठी हे प्रयत्न केले जात असल्याची चर्चा महापालिका प्रशासनामध्ये आहे.

### बैठकींसाठी नवे नियम लागू

**» पुणे महानगरपालिकेच्या विविध समिती बैठकींमध्ये आयत्यावेळी सादर होणाऱ्या प्रस्तावांवर नियंत्रण आणण्यासाठी आयुक्त नवल किशोर राम यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता कोणताही प्रस्ताव बैठकीत मांडण्यासाठी तो किमान एक दिवस आधी अतिरिक्त आयुक्तांकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे प्रस्तावांवर सखोल चर्चा होऊन योग्य निर्णय घेता येतील. आयत्यावेळी प्रस्ताव आणण्याची पद्धत थांबवून प्रशासनात शिस्त व पारदर्शकता वाढवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे..**

# जमीन देणाऱ्यांना दहा टक्के परतावा; बाधित घरांसाठी अडीच गुंठ्यांचा विकसित भूखंड

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली, झाडे, विहिरी व घरांसाठी दुप्पट मोबदल्याची तरतूद

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर येथील प्रस्तावित विमानतळासाठी जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना दहा टक्के भूखंड परतावा देण्यात येणार असून, बाधित घरांसाठी अडीच गुंठ्यांचा विकसित भूखंड देण्यात येणार आहे. दहा टक्के परताव्यासाठी २४५ हेक्टर अतिरिक्त जमीन संपादित करण्यात आली असून, बाधित घरांसाठी ३० हेक्टर जागा संपादित करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ते म्हणाले, 'विमानतळबाधित शेतकऱ्याला दहा टक्के जमिनीचा परतावा देण्यात येणार आहे. हा भूखंड विकसित करण्यात येणार असून, त्यात रस्ते, पाणी आणि वीज या सुविधा महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) देण्यात येतील. हा विकसित भूखंड एअरोसिटीमध्ये आणि विमानतळाच्या प्रवेशद्वाराजवळ असेल. त्यासाठी १ हजार २१६ हेक्टर व्यतिरिक्त अतिरिक्त २४५ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. संमतीने भूसंपादन झाल्यानंतरच हा दहा टक्के भूखंड परतावा शेतकऱ्यांना देण्यात येईल. मात्र, १० जूननंतर संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीसाठी परतावा मिळणार नाही.'

'विमानतळासाठी ज्या शेतकऱ्यांची घरे बाधित होत आहेत, अशा शेतकऱ्यांना अडीच गुंठ्यांचा विकसित भूखंड देण्यात येणार आहे. यासाठी खानवडी आणि पारगाव या दोन गावांमध्ये प्रत्येकी १५ हेक्टर अशी एकूण ३० हेक्टर जमीन संपादित करण्यात येईल. हा भूखंड एअरोसिटी किंवा गावात देण्यात येईल. शेतकऱ्यांना या संदर्भात एक पर्याय निवडता येणार आहे. या भूसंपादनात एकूण ५९७ घरे बाधित होणार आहेत,' असेही त्यांनी सांगितले.

डुडी म्हणाले, 'भूसंपादनाच्या मोबदल्याव्यतिरिक्त भूमिहीनांना ७५०, तर अल्पभूधारक शेतकऱ्यांना ५०० दिवसांच्या मजुरीचे मूल्य देण्यात येणार आहे. एकूण संपादित जमिनींमध्ये सीताफळ आणि अंजीर या दोन फळपिकांचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे. त्यासाठी सीताफळाला ११ हजार ते १३ हजार रुपये आणि अंजिराला १० हजार ते १३ हजार रुपये प्रती झाड मोबदला देण्यात येणार आहे. हा मोबदला या रकमेच्या दुप्पट दिला जाणार आहे. अन्य फळझाडांनाही दुप्पट मोबदला देण्यात येणार आहे. तसेच, वन झाडांना ५ हजार ते २२ हजार रुपये देण्यात येणार असून, मोबदल्यात ही रक्कम दुप्पट दिली जाणार आहे. विहिरीसाठी ३ लाख ते १७ लाख आणि बोअरवेलसाठी ४० हजार ते ६० हजार रुपये रक्कम दिली जाईल. पक्क्या घरासाठी ३ लाख ते ४० लाख रुपये क्षेत्रफळानुसार दिले जातील.'



### '४३६ हेक्टर क्षेत्राची संमती'

» 'संपादनासाठी शेतकऱ्यांकडून संमती घेण्याची प्रक्रिया सोमवारपासून सुरू करण्यात आली असून, आतापर्यंत ४३६ हेक्टर क्षेत्राची संमती मिळाली आहे. येत्या १५ ते २० दिवसांत ५० टक्के क्षेत्राची संमती मिळेल. मोबदला देण्यासाठी सहा हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात येणार असून, आतापर्यंत जिल्हा प्रशासनाकडे ५०० कोटी रुपये जमा झाले आहेत,' असे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले.

### शेतकऱ्यांना १०% भूखंड परतावा

» पुरंदर येथील प्रस्तावित विमानतळ प्रकल्पासाठी जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय प्रशासनाने जाहीर केला आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित जमिनीच्या १० टक्के विकसित भूखंडाचा परतावा देण्यात येणार आहे. या भूखंडात रस्ते, पाणी व वीज सुविधा महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ मार्फत उपलब्ध करून दिल्या जातील. बाधित घरांसाठी अडीच गुंठे जागा देण्यात येणार असून, पुनर्वसनासाठी स्वतंत्र जमीन राखीव ठेवण्यात आली आहे. तसेच झाडे, विहिरी आणि घरांसाठीही दुप्पट मोबदला देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

> करारनामा झाल्यानंतर पुढील दीड महिन्यात परतावा दिलेल्या भूखंडाचा सातबारा किंवा मालमत्तापत्र शेतकऱ्यांना दिले जाईल. या तीन हजार एकर जमिनीत एकूण १३०० सर्व्हे क्रमांक असून, त्यात सुमारे साडेसहा हजार कुटुंबे बाधित होणार आहेत. यातील प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी देण्यात येणार आहे. घर स्थलांतर करण्यासाठी ४० हजार रुपये, तर गोठा स्थलांतर करण्यासाठी २० हजार रुपये दिले जातील.
>
> - जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी.

# म्हाळुंगे-माण टीपी स्कीमला मंजुरी; सरकारच्या निर्णयाने हायटेक सिटी उभारण्याचा मार्ग मोकळा

## सात गावांतील जमिनींसाठी भूसंपादन प्रक्रियेला गती; मोबदला वाटप लवकरच सुरु होणार

**पुणे | प्रतिनिधी**

मुळा आणि मुठा नदीची पूररेषा निश्चित करून नव्याने फेररचना केलेल्या आणि पहिली हायटेक सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या म्हाळुंगे-माण नगररचना योजनेच्या (टीपी स्किम) फेरबदलास नगर विकास विभागाने मान्यता दिली आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) हाती घेतलेली ही टीपी स्कीम मागील आठ वर्षापासून फक्त कागदावरच होती. नगर विकास विभागाच्या मान्यतेमुळे ही योजना अखेर मार्गी लागणार आहे.

पुणे महानगर क्षेत्राचा विकास करण्यासाठी राज्य सरकारकडून पीएमआरडीएची स्थापन करण्यात आली. त्यानंतर पीएमआरडीएने पहिल्याच टप्प्यात सुमारे २५० हेक्टर वरील म्हाळुंगे-माण टीपी स्कीमचे काम हाती घेतले होते. या हाय टेक सिटीचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले होते.

या स्कीमला सर्व प्रकाराच्या मान्यता मिळाल्या होत्या. तसेच हरकती-सूचनांवर सुनावणी घेऊन भूखंडाचे वाटपही पीएमआरडीएकडून निश्चित करण्यात आले होते. वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे प्रॉपर्टी कार्ड तयार करून रहिवाशांना वाटप करण्याचे नियोजन पीएमआरडीएकडून करण्यात आले होते.



### राज्य सरकारकडून मान्यता

» टीपी स्कीम करताना मुळा आणि मुठा नदीची पूररेषा दर्शविण्यात आली नव्हती. दरम्यान जलसंपदा विभागाकडून ती निश्चित करून पीएमआरडीएकडे सादर करण्यात आली. परिणामी या दोन्ही नदी काठच्या पूररेषेत बदल झाल्याने काही भूखंडांमध्ये फेरबदल करावा लागल्याने स्कीमची फेररचना करावी लागली.नगर रचना योजनेच्या क्षेत्रात आणि वाटप करावयाच्या भूखंडामध्येही बदल करावे लागले. नव्याने फेररचना करण्यात आलेली प्रारूप नगर रचना योजना राज्य सरकारकडे पुन्हा मान्यतेसाठी पाठविण्यात आली होती. त्यास राज्य सरकारकडून मान्यता देण्यात आली.